नि.दि.दा. क्र.२३/२०२१
छाया –वि– आनंदराव
नि.क्र.३५ वर पुढे सुरू

**वादी तर्फे साक्षीदार क्र. ०३ यांचा शपथेवर सरतपास ॲड. एस.सी.तरारे मॅडम यांच्यामार्फत:**

आता मला माझ्या साक्षपुराव्याचा हलपनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकुर माझ्या म्हणण्याप्रमाणे लिहीला असुन मला वाचून समजविण्यात आला. त्यावर माझी सही असुन मजकूर बरोबर आहे. त्यास आधीच **निशाणी क्रमांक ३५** देण्यात आलेला आहे.

**सरतपास संपला.**

**प्रतीवादीतर्फे उलटतपास वकील डी. पी. तुळसकर साहेब यांच्यामार्फत सुरू.**

**६.** माझे शिक्षण बी.ए. नापास एवढे आहे. मी माझ्या गावचा सरपंच नव्हतो. २३/०६/२०११ रोजी मी शेतजमीनीच्या मोजणीकरीता गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी यापूर्वी सुध्दा न्यायालयात ब–याच प्रकरणांमध्ये हजर झालो आहे. साक्षीदार सांगतो की, तो पोलीस पाटील आहे. हे म्हणणे खरे आहे की, ब–याच प्रकरणांमध्ये मी साक्षीदार म्हणुन न्यायालयात हजर झालो आहे. साक्षीदार सांगतो की, तो पोलीस पाटील असल्यामुळे त्याला साक्षीदार म्हणुन यावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, मला साक्षबयान देण्याची सवय आहे. प्रस्तुत दाव्यातील वादीचे नाव छायाबाई रामदास डेकाटे आहे. वादीचे पती बॅंकेत मॅनेजर होते तेव्हापासुन माझे वादीसोबत घरगुती संबंध आहेत. मी प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादीला ओळखतो. प्रतिवादीचे नाव आनंदराव जांभुळकर आहे. साक्षीदार सांगतो की, प्रतिवादीचे आडनाव जांभुळे आहे. वादीने सिताबाई चाचेरे यांच्याकडून जमीन घेतली होती. वादीने विकत घेतलेल्या शेतजमीनीचा गट क्रमांक १५६/१ आहे. सिताबाई चाचेरे यांच्याकडे किती शेतजमीन होती हे मला सांगता येणार नाही. वादीने विकत घेतलेल्या जागेच्या चतुर्सिमा मला सांगता येतील. त्या पुर्वेस नदी, पश्चिमेस जांभुळे यांचे शेत, दक्षिणेस रस्ता आणि उत्तरेस पांदण असून वसंत थेरे यांचे शेत आहे. सदर शेतजमीनीचा मोजणीबाबत मला नोटीस मिळाली नव्हती. वादीने मला शेतीची मोजणी आहे असे सांगुन बोलावले होते. मोजणीकरीता मी सकाळी १०:३० ते ११:०० वाजेच्या दरम्यान गेलो होतो. मी मोजणी होईपर्यंत तिथेच थांबलो होतो. मोजणी ०३:०० ते ०४:०० वाजेच्या सुमारास संपली होती. मोजणी नेमकी कधी संपली होती ती

वेळ मला आठवत नाही. मोजणी करमापक प्लेन टेबल ठेवुन करण्यात आली होती. टेबल शेतात ठेवला होता. मोजणी दक्षिण दिशेपासुन सुरू झाली होती. मोजणीच्यावेळी मी फक्त तिथे हजर होतो. मोजणीच्यावेळी जिथे जिथे मोजणी जात होती तिथे तिथे मी जात होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझया साक्षहलफनाम्यातील परिच्छेद क्रमांक ४ मध्ये नमूद केलेल्या मजकुराबाबत मला काही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयात खोटा साक्षहलफनामा दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
| स्वा/– | स्वा/– |
| **(व्ही. आर. फरकुंडे)** | **(व्ही. आर. फरकुंडे)** |
| सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पवनी. | सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पवनी. |
| ०२/०८/२०२५ | ०२/०८/२०२५ |